जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 FEB 2022

लोकसत्ता



कोल्हापुरात सोमवारी सकाळी दाट धुके पसरले होते. शिवाजी विद्यापीठाचा परिसर त्यामध्ये हरवून गेला होता. (छाया - अलोक जत्राटकर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 FEB 2022 पुढारी

# केंद्रीय जल आयोगाच्या निकषांनुसार धरणांतून पाणी सोडणे आवश्यक

## महापूर कृती समितीचा निष्कर्ष; शिवाजी विद्यापीठास अहवाल सादर

पुढारी विशेष

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कृष्णा खोऱ्यातील धरणांतील पाणी सोडण्याचे नियोजन केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करणे हीच कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांत दरवर्षी येणाऱ्या महापुरावरील तत्काळ उपाययोजना आहे, असा निकर्ष सांगली, कोल्हापूर महापूर कृती समितीने शिवाजी विद्यापीठास सादर केलेल्या अहवालातून निघाला आहे. विद्यापीठातील हवामान बदल व शाश्वत विकास केंद्र आता महापुराचा अभ्यास करणार आहे.

कोल्हापूर, सांगलीमध्ये २००५, २००६, २०१९ व पान ४ वर

### जल आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे...

- ३१ जुलै रोजी धरणात पाणीसाठा धरण क्षमतेच्या ५० टक्के असावा.
- ३१ ऑगस्ट रोजी धरणात पाणीसाठा धरण क्षमतेच्या ७७ टक्के असावा.
- १५ सप्टेंबर रोजी धरणात पाणीसाठा धरण क्षमतेच्या १०० टक्के असावा.

# केंद्रीय जल आयोगाच्या निकषांनुसार धरणांतून पाणी सोडणे आवश्यक

(पान १ वरून) २०२१ मध्ये ढगफुटीसारखा पाऊस पडणे, राजापूर बंधाऱ्याच्या खाली कृष्णा नदीस कमी असलेला नैसर्गिक उतार, अलमट्टी धरणातून अनियमित साठा व विसर्ग सोडणे, कृष्णा नदी प्रवाहास होणारे मानवनिर्मित अडथळे व इतर काही कारणांमुळे कृष्णा नदीस महापूर येऊन गेले. आतापर्यंत आलेल्या महापुरांची कारणे एकसारखी आहेत. ३१ मे २०२१ रोजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी कोल्हापूर, सांगली, साताऱ्याचे जिल्हाधिकारी, जलसंपदा खात्याचे मुख्य अभियंता व इतर लोकप्रतिनिधी यांची पूरनियंत्रणासदर्भात बैठक घेतली.

बैठकीत ३१ ऑगस्टपर्यंत अलमट्टी धरणात ५१ हजार ७०० मीटरपर्यंत पाणीपातळी ठेवून राजापूर बंधाऱ्यातून जेवढा विसर्ग खाली जाईल, त्यापेक्षा जादा विसर्ग अलमट्टी धरणातून खाली करावा असे ठरले. परंतु; प्रत्यक्षात अलमट्टी धरणात २९ जुलै २०२१ रोजी पाणीपातळी ५९७.८० मीटर ठेवून खाली विसर्ग कमी सोडण्यात येत होता. त्यामुळे राजाराम बंधारा, आयर्विन पूल येथील पाणीपातळी बदलत राहिली. पूर नियंत्रणात येत नाही असे वाटू लागल्यानंतर राज्य सरकारच्या प्रयत्नानुसार अलमट्टीतून हळूहळू विसर्ग वाढवून तो ३ लाख ५० हजार क्युसेक्सपर्यंत केल्यानंतर पूर नियंत्रणात आला. तोपर्यंत कोल्हापूर, सांगलीतील पाणी उतरण्यास १० ते १२ दिवस लागले, ही वस्तुस्थिती आहे.

महापुरासंदर्भात सांगली, कोल्हापूर पूर नियंत्रणासाठी कृती समिती स्थापन झाली आहे. यात जलअभियंता, पर्यावरण, पाणी विषयावर काम करणारे, सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश आहे. गेल्या चार महिन्यांपासून ग्रामपंचायत व शहर स्तरावर बैठका सुरू आहेत. समितीने कृष्णा नदी महापुरासंदर्भात कोयनानगर धरण ते अलमट्टीपर्यंतच्या धरणातून पाणी सोडण्याचा तांत्रिक अभ्यास केला. यात केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी व्यवस्थित होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. नुकताच समितीने कृष्णा नदी महापुराचा अहवाल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना सादर केला आहे.

> “
> कोल्हापूर, सांगलीत महापूर येऊ नये यासाठी केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे गरजेचे आहे. वीजपुरवठ्यासाठी पाणीसाठा नियंत्रित ठेवण्याबाबत नियोजन केले जावे. चीन, अमेरिकेप्रमाणे पर्जन्यमापन यंत्रणा अद्ययावत ठेवावी. महापूर प्राधिकरण स्थापन करावे, अशी भूमिका राज्य सरकारकडे मांडणार आहोत.
>
> - **हणमंतराव पाटील,** समन्वयक, सांगली, कोल्हापूर महापूर नियंत्रण कृती समिती

### ...अन्यथा महापुराबाबत उच्च न्यायालयात जनहित याचिका

सांगलीतील महापुराचा अहवाल विद्यापीठास सादर केला आहे. कोल्हापूरच्या महापुरासंदर्भात ३० मार्चपर्यंत अहवाल तयार केला जाणार आहे. त्यानंतर कृती समिती व शिवाजी विद्यापीठाचा संयुक्त प्रस्ताव १५ एप्रिलपर्यंत राज्य सरकारला सादर केला जाणार आहे. अहवाल सादर केल्यानंतर सरकारने ठोस भूमिका न घेतल्यास जनआंदोलनाबरोबरच उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली जाणार आहे.

**नदीला महापूर येण्याची कारणे**

नदी व नदीला मिळणाऱ्या उपनद्या, नाले, ओढे यांच्यावरील अतिक्रमणे, नदीवरील बांधकामे पूल, ओढे, कॉजवे यांचे जलशास्त्रीय दृष्टिकोनातून बांधकाम न होणे, जागतिक तापमान वाढीमुळे अनियमित व अतिवृष्टी होणे यांचा अचूक अंदाज न येणे, केंद्रीय जलआयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार धरण साठा न करणे, राजापूर बंधारा ते अलमट्टी धरणापर्यंत नदीचा नैसर्गिक उतार अत्यंत कमी असणे ही महापुराची कारणे आहेत.

**तत्काळ व दीर्घकालीन उपाययोजना**

केंद्र सरकार केंद्रीय जल आयोगाच्या जानेवारी २०१८ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार धरणातील पाणीसाठ्याबाबत काटेकोर पालन करावे, महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांत पूरनियंत्रणाबाबत केंद्रीय जल आयोगाच्या सूचनेनुसार समन्वय ठेवावा, अलमट्टी धरणाची पाणीपातळी १ सप्टेंबरपर्यंत ५९६.०० मीटरपेक्षा जास्त ठेवू नये, सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांसाठी पूर संरक्षक समिती स्थापन करण्यात यावी, अशा तत्काळ उपाययोजना अहवालात सुचविल्या आहेत. त्यामध्ये कृष्णा पाणी वाटप लवादाच्या मान्यतेनंतर कृष्णा नदीच्या पुराचे पाणी इतर खोऱ्यांत बोगद्यांद्वारे वळविणे, केंद्र शासन स्तरावरून नद्या जोड प्रकल्प राबविणे, कृष्णा खोऱ्यातील सर्व धरणांतून एकात्मिक पद्धतीने विसर्ग करणे आवश्यक आहे. कृष्णा खोऱ्यातील सर्व जलाशयांतील पाणी सोडण्याचे आराखडे मान्सून कालावधीत सुधारित करावेत. पूर देखरेख कक्षात निष्णात जल वैज्ञानिकाची कायमस्वरूपी नेमणूक करण्यात यावी, मुख्य नदीच्या लांबीतील सर्व भागांत पूररेषा पातळी आखावी, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवून कार्यपालन आराखडा व 'एसओपी' तयार करावी आदी शिफारसी कृष्णा नदीचा महापूर रोखण्यासाठी कृती समितीने विद्यापीठास दिलेल्या अहवालात केल्या आहेत.

08 FEB 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दाट धुक्याने शहरावर ओढली चादर

## सकाळी दहानंतर झाले सूर्यदर्शन : वाहनधारकांचा दिवे लावूनच प्रवास

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शहर आणि परिसरात सोमवारी सकाळी दहा वाजल्यानंतरच सूर्यदर्शन झाले. तोपर्यंत शहरावर दाट धुक्याने जणू चादरच ओढली होती. दहा वाजल्यानंतर धुके विरळ होत गेले. गेल्या काही दिवसांत प्रथमच सकाळी उशिरापर्यंत धुक्याची तीव्रता राहिली.

गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. थंडीचा कडाका काहीसा कमी होत चालला आहे. मात्र, आज शहर आणि परिसरात दाट धुके पडले. सकाळी सहा-साडेसहा वाजल्यापासूनच धुक्याची दुलई पसरली होती. काही वेळातच त्याची तीव्रता वाढत गेली. धुके इतके दाट होते की, अवघ्या १५-२० फुटांवरीलही काही दिसत नव्हते. वाहनधारकांना तर दिवे लावूनच वाहने चालवावी लागत होती.

धुक्यामुळे शहराचा बहुतांश भाग प्रभावित झाला होता. रंकाळा, कळंबा तलाव, शिवाजी पूल, शिवाजी विद्यापीठ, न्यू पॅलेस, टाऊन हॉल आदी इमारती धुक्यात हरवून गेल्या होत्या. दसरा चौकातील राजर्षी छत्रपती शाहूंचा पुतळा, व्हीनस कॉर्नरवरील छत्रपती राजाराम महाराजांचा पुतळा, विद्यापीठातील छत्रपती शिवरायांचा पुतळा आदींचे धुक्यामुळे दिसणारे रूप विलोभनीय होते. मोकळ्या जागेत अनेक ठिकाणी गवत, झाडे, वेलींवर दवबिंदूही दिसत होते.

सकाळी दहा वाजेपर्यंत धुके होते. दहा वाजल्यानंतरच शहराच्या अनेक भागात सूर्यदर्शन झाले. यानंतर मात्र अवघ्या दहा-पंधरा मिनिटांत धुके विरळ होत गेले. तरीही सकाळी अकरा-साडेअकरा वाजेपर्यंत रंकाळा तलाव परिसरात धुके दिसतच होते. धुक्यामुळे 'मॉर्निंग वॉक' करणाऱ्यांची संख्याही आज काहीशी रोडावलेली होती. सकाळी थंडीही जाणवत असल्याने अनेकांनी लवकर घराबाहेर पडण्याचेही टाळले. दरम्यान, आज शहरात १८ अंश इतक्या किमान तापमानाची नोंद झाली.



**कोल्हापूर : कोल्हापूर शहर आणि परिसरात सोमवारी सकाळी दाट धुके पडले. या धुक्यामुळे शिवाजी विद्यापीठाची इमारत आणि त्यासमोरील युगपुरुष छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे दृश्य विलोभनीय दिसत होते.**

**(छाया : पप्पू अत्तार)**

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज मॉक टेस्ट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर हिवाळी सत्र ऑनलाईन परीक्षेच्या पार्श्वभूमीवर दि. ८ रोजी दुपारी ३.३० वाजता मॉक टेस्टचे आयोजन करण्यात आले आहे. यूजर आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएसद्वारे पाठविण्यात आला आहे.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांना १४ फेब्रुवारीपासून प्रारंभ होणार आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी सूचना व ऑनलाईन संगणक प्रणालीचा डेमो व्हिडीओ ठेवण्यात आला आहे. ऑनलाईन परीक्षेपूर्वी मॉक टेस्ट घेतली जाणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांना यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त झालेला नाही,



अशा विद्यार्थ्यांनी या लिंकवर जाऊन 'Get Your Password' हा पर्याय निवडून नोंदणीकृत ई-मेल आयडीवर पासवर्ड मिळवावा. तांत्रिक अडचणीसाठी विद्यापीठाच्या कॉल सेंटर, हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. मुख्य परीक्षेमध्ये तांत्रिक अडचण येऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट देणे बंधनकारक आहे. परीक्षेचे वेळापत्रक व अन्य माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभागातर्फे आज ऑनलाईन राज्यस्तरीय कार्यशाळा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभागातर्फे मंगळवारी (दि.८) सकाळी ११ वाजता ऑनलाईन राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'डिजिटल मीडिया अँड डिजिटल ॲडव्हर्टायझिंग' या विषयावरील कार्यशाळेत डिजीटल कंटेंट एक्स्पर्ट विश्वनाथ गरुड, पुणे विद्यापीठातील सहायक प्रा. योगेश बोराटे, निहारिका महात्मे, मयूर कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. गुगल मीटवर ही कार्यशाळा होणार आहे. ऑनलाईन कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन वृत्तपत्रविद्या व संवाद आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 FEB 2022 पुण्यनगरी

# विद्यार्थीदशेत वैचारिक बैठक पक्की करावी

## डॉ. शरद बावीस्कर : शिवाजी विद्यापीठात 'मीट द ऑथर' उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी समाजाचा डोळसपणे अभ्यास करून या दशेत आपली वैचारिक बैठक पक्की करण्यास प्राधान्य द्यावे आणि त्यानंतर समाजाच्या प्रश्नांवर व्यक्त व्हावे, असे मत 'भुरा' या प्रसिद्ध आत्मकथनाचे लेखक डॉ. शरद बावीस्कर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे आयोजित 'मीट द ऑथर' या ऑनलाईन उपक्रमांतर्गत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. बावीस्कर म्हणाले, माझ्या वाट्याला जे संघर्षमय आयुष्य आले, ते इतर विद्यार्थ्यांच्या आयुष्यात येऊ नये. या संघर्षातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी आपली पुढील वाटचाल निश्चित करावी, या हेतूने आत्मकथन लिहिण्यास प्रवृत्त झालो. कदाचित या सकारात्मक प्रेरणांमुळेच अवघ्या अडीच महिन्यांत लिहून झालेले हे आत्मकथन खूपच गाजत आहे. मला त्याचे समाधान आहे.

डॉ. बावीस्कर यांनी धुळ्यापासून सुरू झालेल्या आपल्या शैक्षणिक सुरुवातीपासून ते जवाहरलाल नेहरू विद्यापीठात प्राध्यापक होण्यापर्यंत आणि तेथून पुढे 'भुरा'चा लेखक होण्यापर्यंतचा प्रवास विद्यार्थ्यांना कथन केला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोणत्याही संकटासमोर न खचता आयुष्यात पुढे जाण्याची प्रेरणा आत्मकथने व चरित्रे देत असतात. विद्यार्थ्यांनी केवळ भौगोलिकच नव्हे, तर वैचारिक 'शिवार'ही सोडून त्यापलीकडील विश्व आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक, तर डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी आभार मानले. प्रा. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात प्लंबिंगचा डिप्लोमा

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शहरातील इमारतींचे मजले वाढत असताना प्लंबिंगचे अद्ययावत ज्ञान आवश्यक झाले आहे. अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ते देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचा एम. टेक. एन्व्हॉर्मेंट सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभाग सरसावला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून विभागातर्फे प्लंबिंगचा एक वर्षाचा डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू होत आहे. पुणे व मुंबईत अभ्यासक्रमासाठी जाण्याची गरज आता राहणार नाही.

अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर त्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना चांगले करिअर करता यावे, यासाठी प्लंबिंगचा कोर्स तयार केला आहे. पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर यांसह मोठ्या शहरांत इमारतींचे मजले वाढत आहेत. कोल्हापूर शहरात त्याची सुरुवात झाली आहे. इमारतीचे डिझाईन तयार करताना प्लंबिंगचा प्राधान्याने विचार केला जातो. त्याचे ज्ञान अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना झाला तर त्याचा फायदा होतो. विद्यापीठाने त्याअनुषंगाने दर शनिवार व रविवारी विद्यार्थ्यांना प्लंबिंगचे शिक्षण देण्यासाठी



**“ हा अभ्यासक्रम म्हणजे विद्यार्थ्यांना कौशल्य देण्याचा भाग आहे. त्यांच्या उत्तम करिअरसाठी तो उपयुक्त ठरणार आहे. मार्चनंतर त्याची प्रवेश प्रक्रिया सुरू होईल.**
**- प्रा. डॉ. श्रीकांत भोसले,**
विभागप्रमुख, एम.टेक. एन्व्हार्मेंट सायन्स अँड टेक्नॉलॉजी

पावले उचलली आहेत. प्लंबिंग इंजिनिअरिंगमधील तज्ज्ञ मार्गदर्शक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता चाळीस इतकी असून, विलो पंप्स कंपनी प्रयोगशाळेसाठी इक्विपमेंट्स पुरविणार आहे. विशेष म्हणजे इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षात असणारे विद्यार्थीही अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. अन्य अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना येथे प्रवेश मिळणार आहे. याआधी करावा लागणारा पुणे व मुंबईचा फेरा बंद होणार आहे.

सकाळ

# डिजिटल मीडियावर आज कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे मंगळवार (ता. ८) सकाळी ११ वाजता 'डिजिटल मीडिया आणि डिजिटल जाहिरात' विषयावर ऑनलाईन कार्यशाळा होत आहे.

कार्यशाळेत 'डिजिटल माध्यमे' विषयावर डिजिटल माध्यम तज्ज्ञ विश्वनाथ गरुड व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाचे योगेश बोराटे मार्गदर्शन करतील. 'डिजिटल जाहिरात' विषयावर लक्ष मीडियाच्या निहारिक महात्मे, व्हिज्युअल आर्टिस्ट मयूर कुलकर्णी, अश्वमेध मीडियाचे सुशांत उपाध्ये मार्गदर्शन करतील, अशी माहिती समन्वयक प्रा. डॉ. निशा पवार यांनी दिली.

0 8 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुण्याच्या डॉ. शांतिश्री पंडित जेएनयूच्या कुलगुरू

## पहिल्या महिला कुलगुरू; पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाच्या प्राध्यापक



शांतिश्री पंडित

**पुणे, ता. ७ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. शांतिश्री पंडित यांची दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या (जेएनयू) कुलगुरूपदी नियुक्ती झाली आहे. जेएनयूच्या पहिल्या महिला कुलगुरू बनण्याचा मान डॉ. पंडित यांना मिळाला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

जेएनयूचे कुलगुरू डॉ. जगदीश कुमार यांचा पाच वर्षांचा कार्यकाल संपल्यानंतर त्यांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर जेएनयूचे कुलगुरू पद रिक्त होते. त्या जागी डॉ. पंडित यांची नियुक्ती केली आहे. रशियातील सेंट पीटर्सबर्ग येथे जन्मलेल्या डॉ. पंडित यांचे विद्यालयीन ते पदव्युत्तर शिक्षण चेन्नईमध्ये झाले आहे. १९८३ ला त्यांनी इतिहास आणि सामाजिक शास्त्रात बीएची पदवी घेतली. तर १९८५ साली राज्यशास्त्रात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतले आहे. जेएनयू विद्यापीठातूनच एम. फिल आणि पीएच. डीचे शिक्षण पूर्ण केले आहे. पंडित यांनी पुणे विद्यापीठात वीस वर्षांहून अधिक काळ अध्यापनाचे कार्य केले आहे. राज्यशास्त्राचा त्यांचा गाढा अभ्यास असून, दीर्घकाळ त्यांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधनात सहभाग आहे. २००१ ते २००५ या काळात व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी देखील त्यांची नियुक्ती झाली होती. याच काळात त्यांच्याकडे आंतरराष्ट्रीय केंद्राच्या संचालक म्हणूनही जबाबदारी होती. युजीसीच्या विविध समित्यांवर सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांवर त्यांनी वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

### व्यक्ती परिचय

जन्म ........................ १५ जुलै १९६२

भाषा : मराठी, तेलगू, तमिळ, हिंदी, संस्कृत आणि इंग्रजी

एम. फील आणि पीएच. डी. .......... जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली

पीएच. डी. चा विषय .... संसद आणि भारतातील परराष्ट्र धोरण-नेहरूंचा कालखंड

अध्यापनाचा अनुभव ........................ ३४ वर्षे

संशोधनाचा अनुभव ........................ ३६ वर्षे

किती विषय शिकवितात ........................ २१

शोधनिबंध ........................ १६९

पुस्तके ........................ ३

पुस्तकांतील धड्यांचे संपादन ........................ ५७

08 FEB 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महापूर नियंत्रण समितीचा अहवाल विद्यापीठाला सादर

प्रतिनिधी
कोल्हापूर

सांगली येथील कृष्णा महापूर नियंत्रण समितीने शिवाजी विद्यापीठाला महापुराची कारणे आणि उपाययोजनांबाबत संकलित केलेली माहिती सादर केली. विद्यापीठ हवामान बदलाचा अभ्यास करणार आहे. समितीच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून महापूर नियंत्रणाबाबतच्या सूचना एकत्रितपणे सादर केल्या जातील, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील,

## ■ हवामान बदल विभाग अभ्यास करणार

तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत, हवामान बदल विभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांच्याबरोबर शिष्टमंडळाने चर्चा केली. समितीने महापुराबाबत काही माहिती संकलित केली आहे. त्याचा विद्यापीठाने अभ्यास करून शासनाला महापूर नियंत्रणाबाबत सूचना कराव्यात. त्यासाठी समितीने कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतल्याचे संजय परमणे यांनी सांगितले.



चर्चेदरम्यान हवामान बदल विभाग १५ मार्चपर्यंत समितीच्या अहवालावर अभ्यास करणार आहे. पुन्हा १५ एप्रिलला बैठक घेऊन महापूर नियंत्रणाबाबत मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शासनाला सूचना सादर केल्या जाणार आहेत. यावेळी समितीचे हणमंत पवार, विजयकुमार दिवान, प्रभाकर केंगार, प्रदीप वायचळ, शैलेश पवार, नीलेश पवार, संजय कोरे आदी उपस्थित होते.

**समितीने सूचवलेल्या सूचना**

कृष्णा नदीवरील बांधकामे, केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार धरणात पाणीसाठा न करणे, राजापूर बंधारा ते अलमट्टी धरणापर्यंत नदीचा नैसर्गिक उतार अत्यंत कमी असणे ही महापुराची कारणे समितीने विद्यापीठाला सादर केली. महाराष्ट्र कर्नाटक राज्यात पूरनियंत्रणाबाबत सतत समन्वय असावा. पूरसंरक्षक समिती गठीत करावी, अशा सूचना दिल्या आहेत.

0 8 FEB 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : गेल्या काही दिवसापासून थंडीचा कडाका वाढत आहे. धुक्याचा आनंद घेण्यासाठी कोल्हापूर शहरातील नागरिक सकाळपासून घराबाहेर पडतात. शिवाजी विद्यापीठ परिसरावर सोमवारी सकाळी दाट धुक्याची चादर पसरली होती. या धुक्याचा आनंद घेण्याऱ्या नागरिकांचे टिपलेले छायाचित्र. (छाया : रियाज ट्रेनर)

# शहरावर धुक्याची चादर...

प्रतिनिधी
कोल्हापूर

उत्तरेकडील राज्यातील थंडीची लाट आणि बर्फवृष्टी यामुळे राज्यात तापमानात घट झाली आहे. त्यामुळे शहरात सकाळी धुक्याची चादर दिसून येत आहे. सोमवारी सकाळी पुन्हा कोल्हापूरात दाट धुक्याचे विलोभनीय दृश्य दिसून आले.

वातावरणात सतत बदल होत आहे. तापमानात कधी घट तर कधी वाढ होत आहे. तसेच सकाळी धुके पडत आहे. शनिवारी सकाळी तापमानात घट होऊन थंडीचा कडाका वाढला होता. याबरोबरच धुकेही पसरले होते. रविवारी पारा वाढून काही अंशी थंडी कमी झाली होती. सोमवारीही थंडीची तीव्रता कमी होती. मात्र संपूर्ण शहर धुक्यात हरवून गेले होते. धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने वाहनधारकांना हेडलाईट लावूनच वाहने चालवावी लागली. सकाळी दहापर्यंत शहरात धुक्याची चादर होती. सकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांनी या विलोभनीय दृश्याचा अनुभव घेतला.

**चांदोली धरण परिसरात धुक्याची झालर**

शाहूवाडी : शाहूवाडी व शिराळा तालुक्यातील पश्चिम भागातील चांदोली धरण परिसरात शनिवारी रविवारी, पहाटे सर्वत्र धुक्याचे वलय निर्माण झाल्याने हवेत कमालीचा गारठा जाणवत होता. पहाटे सर्वदुर पसरलेल्या धुक्यामुळे सुर्य दर्शनही दहा वाजल्यानंतर हळूहळू सुरू झाले. गारठ्याचे प्रमाण वाढल्याने त्याचा दैनंदिन जीवनावर परिणाम दिसून आला. पहाटे फिरायला जाणाऱ्या, ऊसतोडणी मजुरांना ऊसतोडणी करण्यात अडचणी आल्या. व्यापारी वर्गही सुर्यदर्शन होईपर्यंत शेकोटी पेटवून बसले होते. सर्वत्र पसरलेल्या धुक्याने रोजच्या कामकाजावर परिणाम दिसून आला.

तरुण भारत

# डिजिटल जाहिरात विषयावर विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने मंगळवारी, ८ रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन कार्यशाळा आयोजित केली आहे. 'डिजीटल मीडिया आणि डिजीटल जाहिरात' हा कार्यशाळेचा विषय आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जर्नलिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाचे योगेश बोराटे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

तरुण भारत

# रसायनशास्त्र विभागासाठी 'सर्ब'द्वारे ३१ लाखांचा प्रकल्प मंजूर : डॉ.माने

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा.



डॉ. संजय चव्हाण यांना केंद्रीय विज्ञान, तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत सायन्स अँड इंजिनिअरिंग रिसर्च बोर्ड (सर्ब) कडून ३१ लाख २० हजारांचा संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे, याची माहिती केंद्रीय मंडळाने डॉ. चव्हाण यांना दिली आहे. डॉ. चव्हाण यांनी 'डिझाईन अँड सिंथेसिस ऑफ कार्बन-रिच अल्कीनिल फंक्शनलाईज्ड ट्रांझिशन मेटल कॉम्प्लेक्सेस फॉर देअर लुमिनिसेन्स अँड नॉन-लिनिअर ऑप्टिकल प्रॉपर्टीज" या प्रकल्पाचा प्रस्ताव 'सायन्स अँड इंजिनिअरिंग रिर्सच बोर्ड"ला सादर केला होता. या ३१ लाख २० हजारांच्या संशोधन प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे. नुकताच डीएसटी-स्तुती उपक्रमांतर्गत अडीच कोटींचा प्रकल्प, डीएसटी-फिस्ट, डीएसटी-पर्स आदी उपक्रमांतर्गतही विविध संशोधन प्रकल्प विविध अधिविभागांना मंजूर झाले आहेत. डॉ. चव्हाण यांनी युजीसी, डीएसटी व सर्ब यांचे पाच विविध संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. ऑस्ट्रेलिया- इंडिया स्ट्रॅटेजिक रिसर्च फंडांतर्गत ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञांसह रामन रिसर्च इन्स्टिट्यूट, बंगलोर आणि हैद्राबाद केंद्रीय विद्यापीठातील शास्त्रज्ञांसमवेतही विविध संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे. डॉ. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली १२ विद्यार्थ्यांनी डॉक्टरेट पूर्ण केली आहे.

Times of India

# Nights get cooler in Kolhapur, Sangli, Satara & Solapur again

Times News Network

Pic courtesy: Shivaji University Kolhapur



The premises of Shivaji University Kolhapur engulfed in fog on Monday morning

**Kolhapur:** The minimum temperature has once again dropped in the Kolhapur, Sangli, Satara and Solapur districts, though the maximum temperature has been at a constant high of about 32 degrees Celsius.

As per the Indian Meteorological Department (IMD), the minimum temperature in Kolhapur, which had reached 18 degrees Celsius last week, has dropped to 17.8 degrees Celsius, while the maximum has also slightly dropped to 31.5 degrees Celsius. On Monday, citizens woke up to a foggy morning.

Sangli's minimum temperature on Monday was 16.4 degrees Celsius, while the maximum at 32.5 degrees Celsius. In Satara, the minimum was 14.7 degrees Celsius and the maximum temperature was 32.6 degrees Celsius.

In Solapur too, the minimum fell to 17.1 degrees Celsius, though the day was hot at 34.4 degrees Celsius.

Suchit Hiremath, a cyclist at the Shivaji University premises, said, "I was surprised to see the fog on Monday morning. In the past few days, the day temperatures have been high, but nights are cool. Cycling through the fog was wonderful."